**सोलापूर जनता सहकारी बँक लिमिटेड,**
**सोलापूर**
**(मल्टी स्टेट शेडयूल्ड को-ऑप बँक)**
**"गगनभरारी" शिवस्मारक संकुल, गोल्ड फिंच पेठ, सोलापूर – ४१३००७**
**www.sjsb.bank.in**

# पाहिजेत

सोलापूर जनता सहकारी बँक ही मल्टी स्टेट शेडयूल्ड सहकारी बँक आहे व बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र व कर्नाटक राज्य असून बँकेचे मुख्य कार्यालय, सोलापूर येथे आहे. बँकेचा शाखा विस्तार महाराष्ट्र राज्यामध्ये सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, औरंगाबाद, बीड, नाशिक, मुंबई, पुणे, कोल्हापूर, नांदेड या जिल्ह्यात व कर्नाटक राज्यात विजयपूर येथे आहे.

बँकेत **"ट्रेनी क्लार्क"** या पदाच्या जागा भरण्यासाठी खालील पात्रधारकांकडून ऑनलाईन (Online) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर जागा महाराष्ट्रातील विविध शाखा व कर्नाटकातील विजयपूर शाखांसाठी असून शाखा ठिकाणे वेबसाईट वर उपलब्ध आहेत.

निकष :-

१) वयोमर्यादा:- ३० वर्षे ( दि. ३१/०५/२०२६ पर्यंत )
   अ) बँकिंग क्षेत्रात किमान ०५ वर्षांचा अनुभव असलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादेत ५ वर्षांपर्यंत शिथिलता दिली जाईल.

२) पात्रता:-
   अ) शैक्षणिक पात्रता :- मान्यताप्राप्त विद्यापीठातून (१०+२+३ पॅटर्ननुसार) पदवी परीक्षा किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण
   ब) उमेदवाराला मराठी, हिंदी आणि इंग्रजी वाचता, लिहिता आणि बोलता आले पाहिजे.
   क) संगणक साक्षरता आवश्यक (Word, Excel, Email व Typing)

* **वरील (अ,ब,क) निकष अनिवार्य आहेत.**
* **कर्नाटकातील विजयपूर शाखेसाठी, कन्नड भाषा बोलण्याचे, वाचण्याचे आणि लिहिण्याचे ज्ञान असणाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल.**

३) अनुभव:- नागरी सहकारी बँक किंवा इतर कोणत्याही अनुसूचित / व्यावसायिक बँकेत लिपिक म्हणून अनुभव असलेल्या उमेदवारांना किंवा समकक्ष पदावर अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

४)अर्ज प्रस्तुती:- पात्र इच्छुक उमेदवारांनी जाहिरातीत नमूद केलेल्या तारखेपासून बँकेच्या वेबसाईट www.sjsb.bank.in वर दिलेल्या लिंकनुसार (लिंक/ (www.sjsb.bank.in/View/Page/Careers) आवेदन पत्र ऑनलाईन भरून प्रस्तुत करावे, आवेदन पत्र भरत असताना जी माहिती अनिवार्य आहे, ती पूर्णपणे भरल्यानंतरच अर्ज संगणक प्रणालीतून स्वीकृत होईल. अर्जास संगणक प्रणालीकडून विशिष्ट क्रमांक दिला जाईल. त्या क्रमांकाचा उपयोग परीक्षा शुल्क भरण्यासाठी होणार आहे. उपरोक्तनुसार प्रस्तूत केलेल्या अर्जावर विहीत केलेल्या जागेत उमेदवाराने स्वतः चा स्कॅन केलेला फोटो (पासपोर्ट साईज 3.5cm x 4.5cm) व सही अपलोड करून अर्ज पूर्ण करावा.

५) परीक्षा शुल्क:- पात्र उमेदवारांनी परीक्षा शुल्क रुपये ७७५/- + GST १८% (एकूण ९१५/- भरावयाचे आहे.) सदरचे शुल्क पेमेंट गेट-वे चा उपयोग करून करावयाचे आहे जे परतावा न मिळण्यायोग्य आहे. त्यासाठी संबंधित प्रणालीचे शुल्क अतिरिक्त असेल.

६) परीक्षा:- परीक्षा Computer Based Test (CBT-MCQ Type) ऑनलाईन पद्धतीने घेतली जाईल. सदर परीक्षा सोलापूर (महाराष्ट्र) येथे तसेच आवश्यकतेनुसार अन्य केंद्रावर आयोजित होईल. परीक्षेचा दिनांक, वेळ, केंद्राचे नाव व पत्ता इत्यादी बाबत उमेदवारांच्या हॉल तिकीटमध्ये उल्लेख केला जाईल. हॉल तिकीट डाउनलोड, परीक्षेचा अभ्यासक्रम आणि माहितीपत्रक यासंबंधीची माहिती बँकेच्या वेबसाइटवर उपलब्ध करून दिली जाईल आणि एसएमएस/ई-मेलद्वारे कळवली जाईल.

७) उपस्थिती खर्च:- परीक्षा केंद्रावर उमेदवारांना स्व:खर्चाने येणे/जाणे करावे लागेल. तसेच त्यानंतर मुलाखतीस बोलावल्यास त्यास उमेदवारांना स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल.

८) वेतनः- सदर पदासाठी बँकेच्या धोरणानुसार बँकेने वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे वेतन देण्यात येईल.

| | **पहिला वर्ष (ट्रेनी कालावधी)** | **दूसरा वर्ष (ट्रेनी कालावधी)** | **तिसरा वर्ष (प्रोबेशन कालावधी)** |
|---|---|---|---|
| CTC (Per Month) | Rs. 17500/- | Rs. 22500/- | Rs. 28255/- |

प्रशिक्षणार्थी / परिवीक्षा कालावधीतील समाधानकारक कामगिरी आणि रिक्त जागांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून, उमेदवारांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याचा विचार केला जाऊ शकतो.

९) अन्य बाबी:- लेखी परीक्षा (CBT), व्यक्तिगत मुलाखत, उच्च शिक्षण, संबंधित कामाचा अनुभव यांच्या गुणांकनाचे आधारे अंतिम यादी तयार केली जाईल. नियुक्त उमेदवारास / व्यक्तीस बँकेच्या कामाच्या सोयीच्या दृष्टीने बँकेच्या कोणत्याही शाखेत काम करावे लागेल.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने आवेदन पत्र प्रस्तुत करावे. यासाठी आवेदन पत्र दिनांक 12/06/2026 00.01 AM पासून दिनांक 27/06/2026 मध्यरात्री 23.59 PM पर्यंत प्रस्तुत करता येईल. वरील अटी व शर्तीमध्ये गरजेनुसार बदल करण्याचा अधिकार बँकेकडे राहील. बँक कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता, पात्रतेचे निकष, परीक्षा प्रक्रिया किंवा भरतीचे वेळापत्रक सुधारण्याचा अधिकार बँकेकडे राहतील.

- उमेदवारांनी खोटी व चुकीची माहिती बँकेस कळविल्यास त्यांना या भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर (Stage) अपात्र ठरविण्यात येईल.

- भरतीबाबत कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत तुम्ही प्रशासन विभागाशी मोबाईल क्रमांक 9422068416 वर बँकेच्या कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.30 ते संध्याकाळी 6.00 वेळात संपर्क साधू शकता.

- अर्ज भरताना / दाखल करताना काही तांत्रिक अडचण आल्यास मोबाईल क्रमांक 9028021965 वर संपर्क साधवा.

दि. १२/०६/२०२६

सही-/
मुख्य कार्यकारी अधिकारी